म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. …

ळी-मेळ्यांतील

# ऐतिहासिक गाणीं.



3678

कवि–दादाभाई.

पब्लिशरः–दाजीबा गणपत जाधव, टेंभी, ठाणें.

…ंद येसू शेडगे, निर्णयसागर प्रेस,
…, कोलभाट लेन, मुंबई.

सन १९२८.

REFBK-0003714
REFBK-0003714

# मेळ्यांतील कार्यकारी-मंडळी.

**अध्यक्ष.**

रा. रा. मारुती शिवराम तनपुरे.

**उपाध्यक्ष.**

रा. रा. दाजीबा गणपतराव जाधव.

**मंत्री.**

रा. रा. शंकर नारायण यादव.

,, ,, कृष्णाजी बाळाजी जाधव.

रा. रा. शंकर पुरुषोत्तम भोईर.

,, ,, गोपाळ सोनु पोवार.

**कॅप्टन.**

रा. रा. तुकाराम गोपाळ भोईर.

दा. क्र. ५०१८
REFBK-0003714

ठाणें येथील

# मावळी मेळ्याचीं ऐतिहासिक गाणीं.

## वर्ष चवथें.

### १ पद. ( चाल–मारा तनमा मनसा. )

नमूनि गणपती, नमूं सरस्वती, नमूं या शिवरायासी ॥ ध्रु० ॥ करूं देशकार्य, नमूं गणराय ॥ वंदन करूं या त्यासी ॥ नमूनि गणपती० ॥ १ ॥ विघ्न निवारिता, तो सुखकारिता ॥ प्रथम वंदुं या त्यासी ॥ नमूनि गणपती० ॥ २ ॥

### २ पद. ( होईं विजयी तूं रंभे. )

आला आला तानाजी मावळा । उदयभानु भ्याला शेलारमामाला ॥ ध्रु० ॥ कंक येसाजी, प्रभू बाजी, नेताजी । म्हणती धन्य शिवाजी । भेटूं त्याला ॥ आला० ॥ १ ॥ आम्ही मावळे गडी, शिवाजीचे संवगडी । राजा करूं रायगडीं । शिव बाला ॥ आला० ॥ २ ॥

### ३ पद. ( चाल–नाचे गाय प्यारी. )

ध्याऊं, गाऊं, शिवाच्या गुणाला ॥ ध्रु० ॥ स्वातंत्र्याचा पूर्ण शशी ॥ वंदन त्या शिवरायासी ॥ राष्ट्रवीर तानाजीला । प्राणप्रिय जाहला नमूं या, शिवाला, वीराला, बाजी प्रभूला ॥ गोब्राह्मणपालक जो, वंदूं या तयाला ॥ १ ॥

### ४ पद. ( चाल–घट छांडो सांवरिया भरूं घगरी. )

संगें घेऊनि मावळ्यांचा मेळा । आले तानाजी वीर येसाजी ॥ ध्रु० ॥ देशभक्तांचा हा मेळा । दांडपट्टा हातीं घेउनी भाला ॥ संगें० ॥ १ ॥ रक्षूं म्हणती महाराष्ट्राला । चला भगवा झेंडा लावूं रायगडाला ॥ संगें० ॥ २ ॥

### ५. पद ( चाल–बँडची. )

मिळोनि मावळे गडी । घेऊं घोंगडी, चला सिंहगडीं, जाऊं रायगडीं होऊं संवगडी शिवाजीचे ॥ ध्रु० ॥ शिवाजी आमुचा गुरू । त्यासी नमन करूं, उद्धरूं याSSSSSS ॥ मिळोनि० ॥ १ ॥

## ६ लावणी.

आम्ही शिवबाचे शूर वीर। हातीं घेउनियां समशेर ॥ जाऊं चला० ॥ मायभूमी हांक देई, जाऊं चला सर्वेही ॥ शिवबाच्या स्वर्गी जाई, प्रबळ झाली यवनशाही ॥ आम्हीं देशासाठीं लढणार ॥ हातीं घेउनियां समशेर ॥ जाऊं चला० ॥ १ ॥ हिंदूधर्म लया जाई, ऐसें वर्तती यवन सर्वेही ॥ राष्ट्रवीर म्हणतां तुम्ही ॥ लक्ष लावा स्वधर्मीं ॥ आम्ही धर्मासाठीं मरणार। हातीं घेउनियां समशेर ॥ जाऊं चला० ॥ २ ॥

## ७ लावणी. (चाल–असा रामाच्या राज्याचा न्याई.)

शिवबाला सांगे जिजामाई ॥ कोंडाणा किल्ला तूं घेई ॥ ध्रु० ॥ शिवाजीनें केला विचार, मिळविले मावळे वीर, स्वारी करूया कोंडाण्यावर, गड झालाच पाहिजे सर, अशी बोलते मातुश्री आई ॥ कोंडाणा० ॥ १ ॥ तानाजी बोले शिवबाला, तुम्ही नका जाऊं लढाईला, संगें घेतों मी सूर्याजीला, मामा बी येतों म्हणाला, जर कां दगा झाला तुह्मां कांहीं ॥ कोण राखिल मराठेशाही ॥ शिवबाला० ॥ २ ॥ संगें घेऊन मावळे लोकांला, तानाजी गडापाशीं गेला, तों रस्ताच उमगना त्याला, त्या गांवचा नाईक वश केला, तुला गांव इनाम देऊं पाहीं ॥ रस्ता आह्मासी दाऊन देई ॥ शिवबाला० ॥ ३ ॥ तानाजी म्हणे मामाला, घोरपड लावावी गडाला, ती धरीचना गडाला, मामा म्हणे अपशकुन झाला, धांव म्हणती भवानी माई ॥ घोरपड गडावरती जाई ॥ शिवबाला० ॥ ४ ॥ मग सांगे सूर्याजीला, तूं जाई कल्याण-दरवाजाला, आम्हीं चढुन जाऊं गडाला, तेथून इशारा देऊं तुला, ताना करितो तुझ्या-साठीं घाई ॥ धन्य धन्य पतिव्रता बाई ॥ शिवबाला० ॥ ५ ॥ फौजेसहित गडावर गेला, खूण केली सूर्याजीला, उदयभानू लढूं लागला, त्यांत तानाजी पडला, अशा पतिव्रतेच्या पायीं ॥ तानाजी स्वर्गाला जाई ॥ शिवबाला० ॥ ६ ॥ मामा बोले उदयभानुला, सूड घेऊं दे भाच्याचा मला, पहिल्या दमांत उदयभानू मेला, मोंगलाचा धीर खचला, मोंगल सैन्यें मेलीं ठाय ठायीं ॥ त्यांची गणतिच करवत नाहीं ॥ शिवबाला० ॥ ७ ॥ ही बातमी कळली शिवबाला, तो पळत गडावर आला, गड आला परी सिंह गेला, म्हणुन म्हणती सिंहगड त्याला, आतां बुडाली मराठेशाही ॥ मावळ्यांचा दाता कोणी नाहीं ॥ शिवबाला० ॥ ८ ॥

## ७ गण.

गणराया, आम्ही मावळे लागतों पायां ॥ देई बुद्धि तुझे गुण गाया, गणराया, भक्ता या, बा मोरया ॥ ध्रु० ॥ गण० ॥ मंगलमूर्ती गौरीहरा तूं गणेशा ॥ विघ्ननाशका, गजानना तूं रक्षिं महाराष्ट्र देशा ॥ वंदन करुनी तुजसी आम्ही, लागुं देशकार्या ॥ राष्ट्रकार्यीं शिवराया, रक्षिलें त्वां मोरया ॥ गणराया आम्ही० ॥

## ८ वसईचा पोवाडा.

शाहू छत्रपती महाराज त्यांचे पेशवे चालविती राज ॥ पहा त्या बाजीरावाचें तेज शरण येती परकी राज ॥ ध्रु० ॥ मर्द बाजीराव वीर, संगें मल्हारी होळकर, शिंदे दाभाडे पोवार, मावळे सरदार, शूर बहाद्दर, चल० जी० जी०॥ स्वारी करूनी माळव्यांत, परतले बाजी शहर पुण्यांत, फिरंग्यांनीं केली बहु मात, वसई प्रांतांत ॥ फिरंग्याला चढला माज, हिंदुधर्म बुडेल आज, असून मराठ्यांचें राज, शाहू महाराज राखा लाज, चल० जी० जी० ॥ २ ॥ हिंदुधर्माचा छळ मांडिला, ही बातमी कळली पेशव्याला ॥ चिमणाजी आप्पा शूर भला सांगे बंधूला ॥ संगें द्यावे शूर वीर, चालून जातों मी वसईवर, किल्ला करून येतों सर, हाच निर्धार आहे बेहेत्तर, मेलों तर, चल० जी० जी० ॥३॥ आप्पानें पण हा केला, जमवुनी सरदार लोकांला ॥ मल्हाररावाशीं हुकुम दिला, जावें ठाण्याला ॥ मर्द मल्हारी होळकर, स्वारी करतो ठाण्यावर, किल्ला केला त्यानें सर, मारले सरदार, पेद्रू वीर, चल० जी० जी० ॥ ४ ॥ छापे घालीत फिरंग्यांवरी, चालला हिंदु पुत्र मल्हारी ॥ फौजेसहित आप्पाची स्वारी, आली वज्रेश्वरीं ॥ आप्पानें नवस केला, वज्रेश्वरीभवानीला, यश येऊं दे आम्हांला, मारूं वैऱ्याला, फिरंग्याला चल० जी० जी० ॥ ५ ॥ श्रीमंतांची चालली स्वारी, ओवाळिती नगरच्या नारी ॥ आले हिंदुधर्माचे कैवारी, रावमल्हारी ॥ मराठ्यांचें सैन्य फार, करिती फिरंगी विचार, म्हणती मराठ्यांचे वीर, किल्ला सर आम्ही करणार, चल० जी० जी० ॥ ६ ॥ युद्ध चाललें घनघोर, फिरंगी करिती तोफेचा मार ॥ कामा आले मराठे वीर, पडला विचार ॥ चिमणाजी रणधीर, म्हणे ऐका हो सरदार, किल्ला नाहीं झाला सर, उडवा शीर, किल्ल्यावर, चल० जी० जी०॥ ७ ॥ श्रीमंतांचा पाहुनी निर्धार, बोलती मराठे सरदार ॥

किल्ला केल्याविना सर, नाहीं फिरणार ॥ किल्ल्यामध्यें गुप्त हेर, गेले खंडूजी मानकर, पांचकळशी-अंजुरकर, होउनी सुतार भेदी वीर, चल०जी०जी०॥८॥ सुरुंग लाविती शिंदे राणोजी, दर्यासारंग आंग्रे मानाजी ॥ हल्ले करित चाले चिमणाजी, शूर रणगाजी ॥ लढाईचा पाहुनी रंग, शिंदे उडविती सुरंग, तट झाला असे दुभंग कठिण प्रसंग, म्हणती फिरंग, चल० जी० जी० ॥९॥ पळूं लागलें फिरंगी सैन्य, सरदारपत्नी रूपलावण्य ॥ आप्पानें करूनी सन्मान, केली पाठवण ॥ ब्राह्मण-ब्राह्मणेतर सरदार, एक होउनी झाले स्वार, घेऊन धर्माचा कैवार, तेचि खरे राष्ट्रवीर, चल० जी० जी० ॥ १० ॥ छत्रपती शाहू शिवाच्या वेळीं, भेद आपसांत नव्हता मुळीं ॥ मोडा आपसांतील दुफळी, या विनाशकाळीं ॥ बुडाली मराठे पेशवाई, आत-झाली नोकरशाही, मावळे लागताती पायीं, मोडुनी दुही, आठवा शिवशाही, चल० जी० जी० ॥ ११ ॥

## ९ पद. ( चाल–राधा प्यारी दे ढारो. )

रायगडीं जाऊं चला शिवराया वंदूं चला ॥ ध्रु० ॥ वैशाख द्वितीयेला पुढिल सालीं जाऊं चला ॥ रायगडीं० ॥ १ ॥ तीन शतकें पूर्ण होती राव शिवाजीला ॥ रायगडीं०,॥ २ ॥ पहा देशभक्तिची ध्वजा । हरघडी चल ॥ रायगडीं० ॥ ३ ॥ स्मरूनी मायभूमिला आठवा त्या शिवाला । वंदूं शिवां समाधीला ॥ रायगडीं ॥ ४ ॥

## १० पद. ( चाल–बँडची. )

आला मावळ्यांचा मेळा । हातीं घेउनीयां भाला । वंदुनी गजान-नाला । करूं नमन हिंदभूला ॥ १ ॥ आम्हीं हिंदपुत्र सारे । एक होऊं या रे । देह देशकार्यीं वहा रे । शिवशाही स्मरा रे ॥ २ ॥

## ११ पद. ( चाल–गर्भा. )

धर्मपालक होते शिवराज । आम्ही हिंदु म्हणवितों आज ॥ ध्रु० ॥ मिळवोनी मावळा । स्वधर्म राखिला। धन्य जिजाईपुत्र शिवराज ॥ आम्ही०॥ देशासाठीं ऐक्य करा हिंदभूमि उद्धरा। स्मरा हिंद सुपुत्र शिवराज ॥ आम्ही० ॥

## १२ गण. ( चाल–भो इंदुवदन अरविंदनयन. )

वंदुं गजानना । मूषकवाहना । भवदुःखहरणा। देवा ॥ ध्रु० ॥ येई गौरी-सुता । रक्षि तूं भारता। हाचि आम्हां वर द्यावा ॥ तुजविण भारता । कोणी नसे त्राता । स्वातंत्र्याचा देई ठेवा ॥ १ ॥ वंदुं गजानना० ॥

दो. भा. ... शाखा ...

## १३ लावणी.

## अफझुलखानाचा वध.

महाप्रतापी हा शिवराई । त्याला अफझुल धरतो कायी ॥ ध्रु० ॥ हिंदभूला त्राता कोणी नाहीं । पाहुनी कष्टी होई जिजामाई ॥ तीनें नवसिली देवी शिवाई । अवतार शिवाचा शिवराई ॥ त्याला० ॥ १ ॥ ज्याचे संवगडी मावळे वीर । त्यानें जावळी प्रांत केला सर । विजापुरीं पडला विचार । ज्याला प्रसन्न भवानी माई ॥ त्याला० ॥ २ ॥ विजापुरीं लाविला पण । तो उभा राही अफजुलखान । म्हणे जीवंत आणीन धरून । खान करितो मोठी बढाई ॥ त्याला० ॥ ३ ॥ पण करूनी खान निघाला । तो आला तुळजापुराला । त्यानें छळिलें भवानी मातेला । भवानीचा भक्त शिवराई ॥ त्याला० ॥ ४ ॥ खान तळ देई भीमातिरीं । मनिंचा हेतु लुटावी पंढरी । भक्तलोक म्हणती धांव श्रीहरी । जिथें भक्तांची माउली विठाई ॥ तिथं ॥ ५ ॥ झाले गांवचे लोक एकत्र । तेव्हां नव्हता 'भटाळलेला' मंत्र । ब्राह्मण मराठे मिळुनी सर्वत्र । ज्यांनीं खान पळविला पाहीं ॥ त्याला० ॥६॥ खान चालला किल्ले घेइत । आला पुण्याहुनी वाईत । सह्याद्रिस पाहुनि झाला भयभीत । रायगडीं रहातो शिवराई ॥ त्याला० ॥ ७ ॥ खानानें वकिल धाडिला । पंत तुम्ही वशकरा शिवाजीला । शिवाजीनें, धर्म शिकविला पंताला । आमची धर्मासाठीं लढाई ॥ त्याला० ॥ ८॥ पंत म्हणे शिवरायाला । आम्ही लागतों तुमच्या सेवेला । खानाला घेउनि येतो मी भेटीला । असे धर्मांचे नेते 'भटभाई' । मानिती वंद्य शिवराई ॥ महा० ॥ ॥ ९ ॥ कृष्णाजीनें भुलविला खान । शिवाजी येतो तुम्हां शरण । घ्यावा कार्यभाग साधून । ह्याला दुसरा उपाय कांहीं नाहीं ॥ त्याला० ॥ १० ॥ पंत सांगे अफजुलखानाला । चला जाऊं प्रतापगडाला । जीवंत धरा तुम्ही शिवाजीला । संगें घ्यावा एक शिपाई ॥ त्याला० ॥ ११ ॥ मोरोपंत नेताजी पालकर । यांनीं यावें घांटमाथ्यावर । प्रतापगडीं भेट होणार । आम्हांसंगें तानाजी सवाई । तिथं अफजुल करतो कायी ॥ महा० ॥ १२ ॥ भेटूं लागले शिवाजीखान । खान धरितो शिवाची मान । असा दगा करी जेव्हां खान । वाघनखानें घेतला त्याचा प्राण । असा प्रतापी तो शिवराई ॥ त्याला० ॥ १३ ॥ मराठ्यांचें दैवत ब्राह्मण गाई । हा मंत्र जपुनि शिवराई । त्यानें स्थापिली मराठेशाही । तेव्हां नव्हतीं मतें बारभाई । आम्हीं हिंदपुत्र एक भाई ॥ महाप्रतापी हा शिवराई ॥ १४ ॥

### १४ लावणी. ( चल–नांचूं नाचूं पोरा. )

जाऊं जाऊं चला राखूं हिंदुधर्म आपुला । परकियांचा घाला ॥ धर्मावरी आला, चला जाऊन भेटूं शिवबाला ॥ ध्रु० ॥ जाऊं जाऊं ॥ १ ॥ बाजी प्रभु भला म्हणतो मी मावळा । सर्व मिळून राखूं गोब्राह्मणांला ॥ जाऊं जाऊं० ॥ २ ॥ ब्राह्मण-ब्राह्मणेतर, आपसांत करिती वैर । आठवा बाजीराव पहिला ॥ जाऊं जाऊं० ॥ ३ ॥ राव शिवाजीच्या, धर्म पालकाच्या आठवा तयाच्या गुणाला ॥ जाऊं जाऊं० ॥ ४ ॥

### १५ लावणी. ( चाल–बाळी ग बाळी. )

तो तानाजी, प्रभूवीर बाजी, स्वातंत्र्यवीर जगीं गाजती । स्वातंत्र्याचा भगवा झेंडा । रायगडावरी लाविती ॥ तो तानाजी० ॥ १ ॥ सिद्दी जोहार, फाजलखान, शिवरायावरी धांवती । अफाट सेना घेउनि आले, तळ दिला किल्ल्याभोंवतीं ॥ तो तानाजी० ॥ २ ॥ तो प्रभू बाजी, म्हणे शिवाजी, तुम्ही करा रांगण्यावर वस्ती । पावनखिंडींत गनीम अडवीन । देईन प्राणाची आहुती ॥ तो तानाजी० ॥ ३ ॥ मायभूमीच्या स्वातंत्र्याचा, वीर नवरा तूं या जगतीं । देशरक्षणा कोणी नसे बा, तुजवीण दुसरा शिवनृपती ॥ तो तानाजी० ॥ ४ ॥ पावन खिंडींत, पावन झाली, वीर बाजीची ती कीर्ती । स्वामीकार्यीं तनमन अर्पुनि देह, ठेवि धारातिर्थीं ॥ तो तानाजी० ॥ ५ ॥ वीर बाजीच्या, तानाजीच्या, आंगीं होती बळकट शक्ती ॥ देशभक्त ते खरे शोभती, मायभूमिला सोडविती ॥ तो तानाजी० ॥ ६ ॥ तुम्ही देशभक्त व्हा, शक्ति वाढवा, शक्तिविना नाहीं भक्ती ॥ देशभक्त वीरबाजी तानाजी, लोकमान्य झाले जगतीं ॥ तो तानाजी० ॥ ७ ॥

### १६ पद. ( चाल–मेरा जोबनका रस लुटा. )

बोला बोला शिवाजी बोला, ज्यानें स्वदेश रक्षियला ॥ ध्रु० ॥ मायभवानी प्रसन्न होउनि, देई आशीर्वचनाला ॥ बोला बोला० ॥ १ ॥ दिल्लीपतिला तूरी देऊनि, खान अफजुल मारिला ॥ बोला बोला० ॥ २ ॥

### १७ पद. ( चाल–पेहरी चोली लटका मटका. )

गौरीसुता, नमूं या आतां, श्रीगणनाथा ॥ ध्रु० ॥ ऋद्धि–सिद्धींचा तूं दाता ॥ तूं हिंदभूस होसी त्राता ॥ विनवी जनता, हिंदभूला तारीं आतां ॥ १ ॥ गौरीसुता० ॥

ग्रं. क्र. 3698

## १८ लावणी. ( चाल–नग पलुन जाऊं तूं नारी. )

हिंदुंच्या राखिल्या लाजा ॥ आठवा शिवाजी राजा ॥ ध्रु० ॥ स्वराज्याचें बांधी तोरण ॥ बाळपणांत किल्ला तोरण ॥ घेऊनि मर्दानं ॥ सर्व मावळे एक करून ॥ स्वातंत्र्याची लाविली ध्वजा ॥ आठवा शिवाजी राजा ॥ १ ॥ रायगडीं राज्यरोहण ॥ नेमिले अष्ट प्रधान ॥ स्थापुनि सिंहासन ॥ रक्षिले गाई ब्राह्मण ॥ धन्य होई माउली जिजा ॥ आठवा शिवाजी राजा ॥ २ ॥ रामदासाची शिकवण ॥ करी धर्माचें रक्षण ॥ शत्रू मारून ॥ फेडिलें देशाचें ऋण ॥ सद्धर्मप्रवर्तक राजा ॥ आठवा शिवाजी राजा ॥ ३ ॥ मारिले देश दुश्मन ॥ हिंदुधर्माचें केलें पालन ॥ शिवरायानं ॥ ऐसें करून राजकारण ॥ झाला महाराष्ट्राचा राजा ॥ आठवा शिवाजी राजा ॥ ४ ॥

## १९ लावणी. ( चाल–सासऱ्या जाण्याचा बेत ठरला. )

पाहुनी हिंदभूमीची स्थिती ॥ पूर्वज स्वर्गीं आम्हां हांसती ॥ ध्रु० ॥ आठवावी पूर्वजांची देशभक्ती ॥ दुफळी करूनी कलह माजविणें आमुची ही देशभक्ती ॥ ब्राह्मण ब्राम्हणेतर भांडती ॥ पूर्वज स्वर्गीं० ॥ १ ॥ देशापायीं रक्त सांडिलें पूर्वजें भारतीं ॥ नामधारी वंशज आम्ही व्यर्थ जन्मलों भारतीं ॥ पारतंत्र्य आम्हां जगतीं ॥ पूर्वज स्वर्गीं०. ॥ २ ॥

## २० पद. ( चाल–दहिवालीका तोरा दिखाना. )

मावळे विरांचा मेळा ॥ आला स्वराज्यतारणा ॥ मावळे ॥ ध्रु० ॥ हातीं भाला घेउनि आला ॥ सिंहगडीं करण्या हल्ला ॥ तानाजी वीर तो धजला ॥ आला स्वराज्यतारणा ॥ १ ॥ देशशत्रु निर्दाळण करुनी ॥ मुक्त करी देशाला ॥ मावळा धन्य वीर झाला ॥ आला स्वराज्यतारणा ॥ २ ॥

## २१ पद. ( चाल–नार जाती पतिव्रता. )

महाराष्ट्राचा हा राणा ॥ शिवनेरीं जन्मला ॥ महाराष्ट्रा० ॥ शिवनेरीं जन्मला ॥ मिळवुनी वीर मावळा ॥ रक्षिलें गोब्राह्मणा ॥ ध्रु० ॥ महाराष्ट्रा ॥ पारतंत्र्याच्या पायीं ॥ रडे हिंद देवी धाई ॥ धन्य होई जिजामाई ॥ हालविते पाळणा ॥ महाराष्ट्रा ॥ १ ॥

## २२ गण. ( चाल–जय कृष्णातटवासा. )

जय जय श्री गणनाथा ॥ विनवी तुजसी हिंदजनता ॥ ध्रु० ॥ होसी तूं विघ्नहरता ॥ मुक्त करी आर्य भरता ॥ दे सुबुद्धि देशभक्ता ॥ रिद्धिसिद्धींचा तूं दाता ॥ १ ॥

२३ पद. ( चाल–तुज दिधलें दुःख म्हणूनी. )

वंदन करूं या गणरायासी । देई स्वातंत्र्य मायभूमिसी ॥ ध्रु० ॥ वंदूं या शिवरायासी ॥ रामदासा सद्गुरुसी ॥ हिंदभूसी ॥ द्यावी सुबुद्धि आर्य-जनासी ॥ १ ॥

२४ पद. ( चाल–आनंदाचा कंद. )

रायगडावरी भगवा झेंडा ॥ शिवरायानें लाविला ॥ ध्रु० ॥ स्वामी-भक्तिनें तानाजीनें देह सिंहगडीं ठेविला ॥ १ ॥ परधर्मी यवनी राजे ॥ छळती हिंदू धर्माला ॥ जिजाई पोटीं शिवनेरीवरी धर्मपाल शिव अवतरला ॥ २ ॥

२५ लावणी.

राव चला मुंबईला जाऊं या ॥ गणपतीउत्सव पाहण्या ॥ ध्रु० ॥ गिरगांवाची वाट ॥ गणपतीचा बहु थाट ॥ गोखल्यांचा गणपती पाहाना ॥१॥ अशा मुंबई शहरीं ॥ जावजीशेटच्या घरीं ॥ त्यांच्या गौरीचा उत्सव पाहाना ॥ २ ॥ चौपाटीवरी ॥ गर्दी होते भारी ॥ टिळकरायाचें दर्शन घ्या ना ॥ ४ ॥

२६ लावणी.

राखा मराठी बाणा ॥ आठवा शिवाजी राणा ॥ ध्रु० ॥ चाल० शिवनेरी ॥ किल्ल्यावरी जिजाईच्या उदरीं ॥ महाप्रतापी राणा ॥ आठवा शिवाजी ॥ १ ॥ बाळपणीं ॥ हिंडे रानवनीं ॥ स्वराज्याचा मुगुटमणी ॥ राखी गाई-ब्राह्मणां ॥ आठवा शिवाजी० ॥ २ ॥ स्मरा शिवाजीला ॥ वीर मावळ्यांना ॥ हिंदुधर्म ज्यांनीं राखिला ॥ नमन करूया त्यांना ॥ आठवा शिवाजी ॥ ३ ॥ जिजाई माता ॥ भवानी माता ॥ रामदास गुरु समर्था ॥ वंदन करुनी यांना ॥ आठवा शिवाजी ॥ ४ ॥

२७ लावणी.

रायगडीं नांदतो शिवराणा ॥ थरथरती यवनी सेना ॥ ध्रु० ॥ चाल० ॥ धाक पडला औरंग्याला ॥ त्यानें धाडिलें शाहिस्त्याला ॥ धरुनी आणा तुम्ही शिवाजीला ॥ संगें घेउनि अफाट सेना ॥ जी जी ॥ १ ॥ खान फौजेसहित निघाला ॥ छावणी दिली पुणें शहराला ॥ धाक पडला गांवच्या लोकांला ॥ नशिबीं भोग अमुच्या नाना ॥ जी जी ॥ २ ॥ ही बातमी

कळली शिवबाला ॥ साथिदार घेऊनि तानाजीला ॥ अपरात्रीं गेले पुण्याला ॥ आम्हीं आलों लग्न वरातीला ॥ जी जी ॥ ३ ॥ खान होता शिवाजीवाड्याला ॥ अपरात्रींचा पाहुनि हल्ला ॥ खान म्हणतो अल्ला अल्ला ॥ स्त्रीवेशानें खान पळाला ॥ जी जी ॥ ४ ॥

## २८ गणस्तुति.

विघ्ननाशना, दयाघना, गजानना, करुनि कृपा, आर्यजना, रक्षिं गौरीनंदना ॥ ध्रु० ॥ १ ॥

### नमन.

नमन करुं या, गणरायाला । गौरीहराला । लंबोदराला । देशामध्यें झाला सर्व अंधार । पक्षभेद वाढूं लागला फार ॥ तूंच गणराज विघ्नहरणार ॥ जी, जी, जी ॥ ध्रु० ॥ मग नमूं शिवरायाला । रामदासाला । माय भवानीला । जिजाई माता, शहाजी राजाला ॥ नरवीर मालुसऱ्यांना ॥ कंक येसाजी, बाजी प्रभूंना ॥ जी, जी, जी ॥ चाल० ॥ नेताजी पालकर, जीवा म्हाल्यांना । करूं या नमना । जी, जी । फसलकर बाजी, मोरो पंतांना । करूया नमना । जी, जी । दादोजी कोंडदेव, बाळाजी आवजींना । करूया नमना, जी, जी । सूर्याजी, शेलारमामांना करूया नमना, जी, जी । आबाजी सोनदेव, मुरारबाजींनां । करूया नमना जी, जी ॥ १ ॥ असें नमन करूनी वीरांना । हिंदपुत्रांना । मायभूमिला । शिवरायांच्या मावळ्यांना ॥ देशापायीं देउनी आपुल्या प्राणा । स्वर्गींच्या सर्व पूर्वजांना ॥ जी, जी, जी ॥ चाल० ॥ रायगडींच्या राजसिंहासना । करूया नमना, जी, जी । पंतसचीव अष्टप्रधानां । करूया जी, जी ॥ काशीच्या गागाभट्टांना । करूया नमना जी, जी । प्रतापराव गुजरांना । करूया नमना जी, जी ॥ हंबीरराव मोहित्यांना । करूया नमना जी, जी ॥ २ ॥ म्लेंच्छ आलें आमुच्या देशाला । हाहा:कार झाला । हिंदुधर्माला । हिंदुधर्म ठार होणार म्हणून शिवराय घेती अवतार ॥ आह्मी त्यांचे गुण गाणार । जी, जी, जी ॥ धर्मवीर संभाजी रायांना करूया नमना जी, जी ॥ राजाराम महाराजांना । करूया नमना जी, जी ॥ सेनापती धनाजी जाधवांना । करूया नमना जी, जी ॥ संताजी घोरपड्यांना । करूया नमना जी, जी ॥ शाहूमहाराज छत्रपतींना । करूया नमना जी, जी ॥ बाळाजी विश्वनाथ पेशव्यांना ।

करूंया नमना जी, जी ॥ ३ ॥ मग नमूं बाजीरावाला । चिमणाजी आप्पाला । नानासाहेबांना । सदाशिवभाऊ, विश्वासरावास ॥ देह ठेविती पानिपतास ॥ म्हणूनी नमन करूंया त्यांस ॥ जी, जी, जी ॥ चाल० ॥ महादजी शिंदे, मल्हाररावांना । करूंया नमना जी, जी ॥ पोवार, दाभाडे, रघुजी भोसल्यांना । करूंया नमना जी, जी ॥ सातारच्या प्रतापसिंहांना । करूंया नमना जी, जी ॥ नानासाहेब फडणविसांना । करूंया नमना जी, जी ॥ माधवराव, नानासाहेबांना । करूंया नमना जी, जी ॥ हरीभाऊ फडके, बापू गोखल्यांना । करूंया नमना जी, जी ॥ लोकमान्य देशभक्तांना । करूंया नमना जी, जी ॥ ४ ॥ नमन करूंया शूर स्त्रियांना । अहिल्याबाईला । ताई तेलिणीला । लक्ष्मीबाई राणी, भवानी तलवार ॥ रणीं तळपली नार अनिवार ॥ म्हणून आम्ही त्यांस नमन करणार । जी, जी, जी ॥ करितों विनंती आर्यजनांना । हिंदू लोकांना । देशबंधूंना । देशावर हल्ले होती अनिवार ॥ राखा तुम्ही पूर्वजांचें घरदार ॥ भांडणानें व्हाल आपसामधीं ठार ॥ जगामध्यें छीः थूः तुमची होणार । जी, जी, जी ॥ ५ ॥

REFBK-0003714
REFBK-0003714

समाप्त.

3698